जा.क्र.उमाशि-३/पुवि/११ वी कें.प्र./२०१३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : १५/७/२०१३

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे शहर व पिंपरी-चिंचवड परिसर.

**विषय : इ. ११ वी केंद्रीय प्रवेश सन २०१३-१४ प्रवेशाबाबतची कार्यपध्दती.**

पुणे शहर व पिंपरी-चिंचवड परिसरातील इ. ११ वी प्रवेश केंद्रीय समितीकडून केंद्रीय प्रवेश पद्धतीने निश्चित केले जातात. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाच्या इ. ११ वी प्रवेशाच्या निवड याद्या व प्रतिक्षा याद्या सोबत आहेत. तसेच सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चितीबाबतचे निकालपत्र त्यासोबत जोडलेले आहेत. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या निवड याद्या व प्रतिक्षा याद्या तपासून घ्याव्यात. त्याबाबत काही शंका असल्यास तात्काळ प्रवेश समिती कार्यालय **आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे** यांच्याशी संपर्क साधावा. प्रवेश समिती कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक - **7774011695** व **7774011696** असा आहे.

इ. ११ वी च्या प्रवेशाबाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील. सदर वेळापत्रकाप्रमाणे प्रवेशाबाबतची कार्यवाही करुन अहवाल प्रवेश समिती कार्यालयास व या कार्यालयास न चुकता सादर करावा याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रवेश प्रक्रियेबाबत तपशिल |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | १५/७/२०१३ | सायं. ५.०० वाजता | प्रवेश यादी सूचना फलकावर लावणे. |
| २ | १६/७/२०१३ ते १९/७/२०१३ | सकाळी १०.३० ते ५.०० | प्रवेश यादीनुसार यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| ३ | २०/७/२०१३ | सायं ५.०० वाजता | रिक्त राहिलेल्या जागांसाठी पहिली प्रतिक्षा यादी लावणे. |
| ४ | २२/७/२०१३ ते २३/७/२०१३ | सकाळी १०.३० ते ५.०० | पहिल्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| ५ | २३/७/२०१३ | सायंकाळी ५.०० वाजता | रिक्त राहिलेल्या जागांसाठी दुसरी प्रतिक्षा यादी लावणे. |
| ६ | २४/७/२०१३ ते २५/७/२०१३ | सकाळी १०.३० ते ५.०० | दुसऱ्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| ७ | २६/७/२०१३ | सकाळी ११.०० वाजता **(अत्यंत महत्वाचे)→** | शाखा, माध्यमनिहाय रिक्त जागांचा तपशील समिती कार्यालय **आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेराड, पुणे** यांना विहित नमुन्यात सादर करणे. **प्राचार्यांनी व्यक्तिश:सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे.** |
| ८ | २७/७/२०१३ व २९/७/२०१३ | सकाळी १०.३० ते ५.०० | अेटीकेटी विद्यार्थ्यांना प्रवेश समितीच्या प्रवेश आदेश पत्रानुसार प्रवेश देणे. हे प्रवेश **आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेराड, पुणे** येथे टेबल पध्दतीने होतील. |
| ९ | ३०/७/२०१३ व ३१/७/२०१३ | सकाळी १०.३० ते ५.०० | बाहेरुन आलेले विद्यार्थी अथवा अपवादात्मक परिस्थितीत केंद्रीय प्रवेश पध्दतीत फॉर्म न भरलेले विद्यार्थ्यांकडून मूळ कागदपत्र दाखविल्यावर कनिष्ठ महाविद्यालयांनी (रिक्त जागा व कटऑफनुसार) प्रवेश अर्ज देणे व तो भरुन घेणे. |
| १० | १/८/२०१२ | सायंकाळी ५.०० वाजता | कनिष्ठ महाविद्यालयांनी प्राप्त प्रवेश अर्जानुसार व रिक्त जागांनुसार गुणवत्ता यादी जाहिर करणे. |
| ११ | २/८/२०१३ व ३/८/२०१३ | सकाळी १०.३० ते ५.०० | गुणवत्ता यादीनुसार प्रवेश देणे. |
| **१२** | **२२/७/२०१३** | **सर्व कनिष्ठ महाविद्यालयांचे अध्यापनाचे कामकाज (इ. ११ वी) सुरु करणे.** | |

इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रिया सुलभरित्या पार पाडण्यासाठी खालीलप्रमाणे सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यांत येत आहे. त्याचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

१. केंद्रीय प्रवेश समितीकडून प्राप्त झालेली आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची संपूर्ण गुणवत्ता यादी कनिष्ठ महाविदयालयाच्या दर्शनी भागात लावावी. तसेच संपूर्ण प्रवेशाबाबत दोन निकाल पुस्तिकांपैकी सुटी निकाल पुस्तिका पालक व विद्यार्थ्यांना पाहण्यासाठी दर्शनी भागात लावावी आणि दुसरी प्रत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात सर्वांना माहितीसाठी उपलब्ध ठेवावी.

२. **पहिल्या प्रवेश यादीतील प्रवेश पूर्ण झाल्यानंतरच रिक्त जागांनुसार पहिली प्रतिक्षा यादी लावावी. पहिल्या प्रतिक्षा यादीचा कालावधी संपल्यानंतर रिक्त जागानुसार दुसरी प्रतिक्षा यादी लावावी.**

३. प्रवेश निवड यादीमधील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी इ. १० वी च्या परीक्षेतील गुणांची टक्केवारी व निवड यादीमधील दाखविलेली टक्केवारी बरोबर असल्याची खात्री त्यांच्या मूळ गुणपत्रिकेवरुन करावी.

४. मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जातीचे मूळ प्रमाणपत्र तपासून खात्री करुनच प्रवेश द्यावेत. विद्यार्थी जातीचे दाखले सादर शकत नसतील तर त्यांना पुरेशी मुदत देण्याबाबत प्राचार्यांनी हमीपत्र घेवून निर्णय घेऊन कार्यवाही करावी.

५. ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सर्वसाधारण गुणवत्ता यादीतील कट ऑफ पॉईंटच्या मर्यादेत गुण मिळाले आहेत अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सर्वसाधारण संवर्गातून प्रवेश दिला आहे. यामुळे काही जागा रिक्त होतील त्या जागा भरुन काढण्यासाठी प्रत्यक्ष यादीवरील त्या त्या संवर्गातील विद्यार्थ्यांचा गुणवत्तेनुसार विचार करावा.

६. अ) खेळाडू, बदली, अपंग, आजी/माजी सैनिक, स्वातंत्र सैनिक इ. संवर्गातील प्रवेश देतांना आवश्यक ती मूळ प्रमाणपत्रे तपासून प्रवेश देण्यांत यावा. याबाबत काही शंका निर्माण झाल्यास समिती कार्यालयाकडे संपर्क साधावा.

**ब)** परराज्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी राखीव संवर्गात प्रवेश देतेवेळी महाराष्ट्रातील सक्षम अधिकाऱ्याकडून त्यांच्या राखीव संवर्गाचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊनच त्यांचा प्रवेश मान्य करावा. असे प्रमाणपत्र सादर करु शकत नसतील तर सदर प्रवेश नाकारण्यात यावा

७. निवड यादीतील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर जर त्यांना अन्य कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिक्षा यादीनुसार प्रवेश घ्यावयाचा असेल तर पहिल्या कनिष्ठ महाविद्यालयातील त्याचा प्रवेश रद्द करुन त्यास त्यांचा मूळ शाळा सोडल्याचा दाखला परत करावा व सदर विद्यार्थ्यांकडून **"अन्य कनिष्ठ महाविद्यालयात प्रतिक्षा यादीनुसार मला प्रवेश मिळाला असल्याने माझा आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात घेतलेला प्रवेश रद्द करावा व मूळ शाळा सोडल्याचा दाखला परत करण्यात यावा. तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील मला मिळालेला प्रवेश मी माझ्या स्वेच्छेने रद्द करीत असून यापुढे प्रवेशासाठी पुन्हा येणार नाही व त्याबाबत तक्रार करण्याचा मला अधिकार राहणार नाही."** असे लेखी हमीपत्र लिहून घ्यावे व त्याची मूळ प्रमाणपत्रे परत करावीत, व त्यांनी भरलेली प्रवेश

फी, माफक सेवाशुल्क वजा करुन अन्य सर्व प्रकारचे शुल्क त्यांना परत करण्यात यावे. त्याबाबत त्यांना कसलीही तक्रार करण्यास वाव मिळणार नाही, व अशा प्रकारच्या तक्रारी या कार्यालयाकडे येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

८. प्रवेशाबाबत विद्यार्थ्यांनी प्रवेश समितीकडे केलेल्या तक्रारीनुसार तक्रार अर्जाची व प्रवेश अर्जाची छाननी करुन समितीने तक्रार मान्य केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात निश्चित झाल्यास प्रवेश समितीच्या प्रवेशपत्रानुसार सदर विद्यार्थ्यांचा प्रवेश आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात मान्य करावा. अशा प्रवेशांची संख्या नगण्य असेल.

९. केंद्रीय प्रवेश समितीकडून प्राप्त झालेल्या निवड/प्रतिक्षा यादीतील काही विद्यार्थी जून २०१२ किंवा त्यापूर्वी इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेले असतील व त्यांच्याकडे शाळा सोडण्याचा मूळ दाखला असेल (म्हणजेच अशा विद्यार्थ्यांनी इ. १० वी उत्तीर्ण झाल्यानंतर कोणत्याही शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसेल) अशा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास हरकत नाही. तथापि त्यांचेकडे शाळा सोडल्याचा मूळ दाखला नसेल व त्यांचा समावेश चुकून निवड अथवा प्रतिक्षा यादीत करण्यांत आलेला असल्यास त्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत समितीशी संपर्क करावा.

१०. **वरील प्रवेश प्रक्रियेनुसार निवड/प्रतिक्षा यादीतील कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रवेश क्षमते इतक्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले नाही तर रिक्त राहीलेल्या जागा समितीच्या परवानगी शिवाय कोणत्याही परिस्थितीत भरण्यात येवू नयेत.**

११. दिनांक २६/७/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता खालील नमून्यात रिक्त जागांचा तपशील प्रवेश समितीस सादर करावा.

**शाखा :** **माध्यम :**

| अ.क्रं. | आरक्षण | आरक्षण प्रमाणे प्रवेश क्षमता | समितीने दिलेली प्रवेश संख्या / यादीनुसार | यादी प्रमाणे प्रत्यक्ष झालेले प्रवेश | यादीतील रिक्त राहीलेल्या जागा |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ.जाती | | | | |
| २ | अ.जमाती | | | | |
| ३ | वि.जाती | | | | |
| ४ | भज ब | | | | |
| ५ | भज क | | | | |
| ६ | भज ड | | | | |
| ७ | इमाव | | | | |
| ८ | विमाप्र | | | | |
| ९ | खुला | | | | |
| १० | आजी माजी सैनिक/ बदली/स्वा.सैनिक | | | | |
| ११ | कला व क्रीडा | | | | |
| १२ | अपंग | | | | |
| | एकूण | | | | |
| शाखा व माध्यमासाठी स्वतंत्र प्रपत्र वापरावे | | | | | |

१२. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या शालान्त प्रमाणपत्राव्यतिरिक्त अन्य बोर्डांची अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा महाराष्ट्र राज्याबाहेरील राज्यातील किंवा परदेशातील विद्यार्थ्यांसाठी **योग्यता प्रमाणपत्र** पुणे विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून मिळाल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश कायम होणार नाही., याची संबंधित विद्यार्थ्यांला प्रवेशाच्या वेळी स्पष्ट कल्पना द्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

१३. योग्यता प्रमाणपत्राच्या अभावी विद्यार्थ्यांचा तात्पुरत्या स्वरुपातील प्रवेश रद्द होणे किंवा विद्यार्थी वार्षिक परीक्षेस अपात्र ठरविला जाण्याची कार्यवाही होऊ शकते सबब संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यापासून १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह पुणे विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करावा व योग्यता प्रमाणपत्र मिळवावे ही जबाबदारी विद्यार्थी व संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची राहील.

१४. प्रवेश अर्जासोबत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबत गुणपत्रकाची सत्यप्रत जोडणे आवश्यक असतांना काही विद्यार्थ्यांनी अशी गुणपत्रकाच्या प्रती जोडलेल्या नाहीत अशा विद्यार्थ्यांना केवळ त्यांच्या अर्जात नमुद केलेल्या गुणांच्या आधारे प्रवेश निश्चित केला आहे. मात्र प्रत्यक्ष प्रवेश देते वेळी प्राचार्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या संलग्न प्रमाणपत्र व्यतिरिक्त अन्य बोर्डाची अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा महाराष्ट्र राज्याबाहेरील इतर राज्यातील किंवा परदेशातील विद्यार्थ्यांची गुणपत्रके तपासून टक्केवारीची खात्री करुन, वैधता तपासून आवश्यक ते प्रमाणपत्रे व गुणपत्रके तपासून (कट ऑफ पॉईंट) नुसार प्रवेश निश्चित होत असल्यास देण्यात यावा. अन्यथा सबळ कारण देवून प्रवेश नाकारता येईल.

१५. पटपडताळणी व कार्यभार निश्चिती करताना प्रत्यक्ष प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या तसेच व्यवस्थापन कोटा ५ % माध्यमिक शाळासंलग्न, उच्च माध्यमिकसाठी २० % व अल्पसंख्यांक संस्था ५० % कोटा कमाल प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत राहून मान्य केला जाईल.सदर आरक्षणाशिवाय जादा दिलेले प्रवेश रद्द करण्यात येतील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील

१६. **इ. ११ वी प्रवेशाबाबतची कार्यवाही प्राचार्यांनी वरील सूचनाप्रमाणे करणे आवश्यक असतांनाही एखाद्या विशिष्ट विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश समितीकडून अथवा शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयाकडून पत्राची अथवा चिठ्ठीची मागणी केली जाते असे पालकांकडून समजते. परंतु केंद्रीय प्रवेश समितीकडून कोणतेही पत्र अथवा चिठ्ठी देण्याची तरतूद प्रवेश पध्दतीमध्ये करण्यात आलेली नाही. तेव्हा अशा प्रकारची मागणी करु नये.**

१७. प्रवेश देतांना संस्थेने/कनिष्ठ महाविद्यालयाने कोणत्याही प्रकारे विद्यार्थी /पालक व संबंधित व्यक्तींकडून कसल्याही प्रकारची देणगी व कॅपीटेशन फी घेणे सन १९८८ चा महाराष्ट्र

अधिनियम क्रमांक ६, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध)अधिनियम १९८७ नुसार दंडनीय गुन्हा आहे. याची दक्षता घ्यावी.

१८. **माहितीचा अधिकार विषयीचा कायदा २००५ मध्ये आस्तित्वात आलेला आहे. एखाद्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये झालेल्या एकूण प्रवेशाबाबतची माहिती जाणून घेण्याचा अधिकार विद्यार्थी / पालक / स्वयंसेवी संस्था अथवा समाजातील अन्य घटकांना निश्चितच आहे. त्यामुळे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये झालेल्या प्रवेशाबाबतची माहिती, मागणी केली जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यासाठी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी च्या वर्गात दिलेल्या प्रवेशाबाबत प्रवर्गनिहाय माहिती जनमाहिती अधिकारी म्हणून प्राचार्य / मुख्याध्यापक यांनी, संबंधितांनी मागणी केल्यास द्यावयाचे आहे. प्रवेशाचे कामकाज चालू असतानाच सदर प्रवर्गनिहाय अद्ययावत याद्या बिनचूक तयार ठेवाव्यात मागणी केल्याबरोबर विनाविलंब संबंधिताना माहिती उपलब्ध करुन द्यावी. याबाबत कोणतेही माहिती न दिलेबाबतचे या कार्यालयाकडे तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी.**

वरील सर्व बाबी विचारात घेऊन इ. ११ वी प्रवेशाबाबत कार्यवाही करावी.

**(सुमन शिंदे)**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे-१**
तथा **अध्यक्ष**
**इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समिती**
**पुणे – १.**